International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 7.065
Vol.7 No.3 Jan –Feb 2020

# सोलापूर जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा चिकित्सक अभ्यास

**डॉ. सोमनाथ वसंतराव पाटील**
एम. ए. एम. फिल, पीएच. डी., सेट. ( अर्थशास्त्र )
एस . एस . ढमढेरे महाविद्यालय तळेगाव ढमढेरे ता. शिरूर, जि. पुणे.

**सारांश :**

कोणत्याही प्रदेशाची, देशाची, राज्याची, जिल्ह्याची प्रगती ही त्या देशातील लोकसंख्या आणि तेथील नैसर्गिक साधनसंपत्ती यावर अवलंबून असते. सोलापूर जिल्ह्याचा लोकसंख्येचा अभ्यास केला असता असे आढळून येते की लोकसंख्येची सर्वात जास्त दशवार्षिक वाढ ही प्रामुख्याने द. सोलापूर या तालुक्यात आढळून येते कारण हे ठिकाण जिल्हा मुख्यालयाअंतर्गत येते तसेच त्या ठिकाणांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, औदोगिक विकास झाल्यामुळे या तालुक्यातील लोकसंख्या वाढीचा दर हा जास्त असल्याचे अढ़ळुन येते., तर सर्वात कमी लोकसंख्या वाढ ही अक्कलकोट तालुक्यात झालेली दिसुन येते. नागरी लोकसंख्येची सर्वात जास्त धनात्मक वाढ ही उ. सोलापूर आणि माळशिरस या तालुक्यात आढळून येते. माढा या तालुक्यात नागरी लोकसंख्याची ऋणात्मक दशवार्षिक घट झाल्याचे अढ़ळून येते. ग्रामीण लोकसंख्येची सर्वात जास्त धनात्मक वाढ उ. सोलापूर, दक्षिण सोलापूर, सांगोला आणि मंगळवेढा या तालुक्यात आढळून येते कारण त्या ठिकाणी लोकसंख्या वाढीचा दर जास्त आढ़ळून येतो. माळशिरस या तालुक्यात ग्रामीण लोकसंख्याची ऋणात्मक दशवार्षिक घट झाल्याचे अढ़ळून येते. एखाद्या ठिकाणांची किंवा प्रदेशातील वेगाने वाढणारी लोकसंख्या ही एक गंभीर समस्या ठरते. भारत देशात अतिरिक्त लोकसंख्येच्या वाढीमुळे लोकसंख्या विस्फोटाची (Popuation Explosion ) स्थिती निर्माण झाली आहे.

***बीजसंज्ञा:*** *लोकसंख्या, लोकसंख्या वाढ, साधनसंपत्ती, लोकसंख्या विस्फोट इ.*

**प्रस्तावना:**

जगातील तसेच भारतातील लोकसंख्या वाढ एक जागतिक सामाजिक समस्या बनली आहे. तसेच लोकसंख्या वाढ हा एक जिव्हाळयाचा विषय बनला आहे. जगाचा जर विचार केला तर सर्वात जास्त लोकसंख्या ही चीन देशात तर त्याखालोखाल भारत हा देश जगात लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे. लोकसंख्या ही कोणत्याही देशाची साधन संपत्ती झाली असली तरी अतिरिक्त लोकसंख्या ही त्या देशाची

एक मोठी अस्ते. अतिरिक्त लोकसंख्येमुळे देशाच्या प्रदेशाच्या साधनसंपत्तीवर ताण येऊन अनेक प्रकारच्या समस्या उभ्या राहतात. लोकसंख्यासंख्या वाढीमुळे अनेक गंभीर समस्यांना सामोरे जावे लागते. संख्यात्मक लोकसंख्येपेक्षा गुणात्मक लोकसंख्या ही प्रत्येक देशाच्या व राज्याच्या प्रगतीचा महत्त्वाचा घटक असते. म्हणजेच एकंदरीत त्या प्रदेशातील संख्यात्मक लोकसंख्येपेक्षा गुणात्मक लोकसंख्या ही कुठल्याही भागाची प्रगतीचा घटक मानला जातो. सोलापूर जिल्ह्याचा एकंदरीत विचार केला असता नागरी भागात जास्त लोकसंख्या आढळून येते तर ग्रामीण भागात कमी लोकसंख्या लोकसंख्या आढळून येते.

**अभ्यास क्षेत्र:**

सोलापूर जिल्हा हा भीमा-सीना नद्यांच्या खोऱ्यात वसलेला आहे. भीमा नदीचा उगम हा भीमाशंकर पुणे जिल्ह्यात होऊन महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्यातुन पुढे कर्नाटक राज्यात कृष्णा नदीला मिळते. सोलापूर जिल्ह्याचे स्थान हे 17°10' उत्तर ते 18°32' उत्तर अक्षांश आणि 74°42' पूर्व ते 76°15' पूर्व रेखांश दरम्यान आहे. सोलापूर जिल्ह्याच्या पश्चिम दिशेस महादेव डोंगररांगा तर पुर्वेस उस्मानाबाद जिल्ह्यातील बालाघाटच्या डोंगररांगा आहेत. जिल्ह्याच्या नैऋत्येस सांगली, पश्चिमेस सातारा, वायव्येस पुणे, उत्तरेस अहमदनगर, पूर्वेस बीड व उस्मानाबाद आणि दक्षिणेस कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्हा हे लगतचे जिल्हे आहेत. जिल्ह्याचे प्रशासकीय कामकाजासाठी अकरा तालुक्यांमध्ये विभागणी केली आहे, ज्यामध्ये 1150 गावे आणि 13 शहरी भाग आहेत. करमाळा, माढा, बार्शी, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, माळशिरस, सांगोला, मंगळवेढा, अक्कलकोट हे अकरा तालुके आहेत. 2011 च्या जनगणनेनुसार जिल्ह्याची एकूण लोकसंख्या 43,17,756 होती, ज्यामध्ये नागरी लोकसंख्या ही 29,18,665 आणि ग्रामिण लोकसंख्या 20,81,749 होती. महाराष्ट्र राज्यामधे सोलापूर जिल्ह्याचे क्षेत्रफळ सुमारे 4.8 टक्के आहे आणि सुमारे 4.51 टक्के लोकसंख्या ही सोलापूर जिल्ह्याची आहे. महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये सोलापूर जिल्हा हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने चौथ्या क्रमांकावर आणि लोकसंख्येच्या दृष्टीने सातव्या क्रमांकावर आहे. जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र 14,889 चौरस किलोमीटर आहे.




**अभ्यासाची उद्दिष्टे:**

सोलापूर जिल्ह्याच्या लोकसंख्यावाढीचा चिकित्सक अभ्यास करण्याकरिता खालील उद्दिष्टे प्रामुख्याने विचारात घेतली आहेत.

1. जिल्ह्यातील लोकसंख्या वाढीचा दर अभ्यासने.
2. जिल्ह्यातील लोकसंख्या वितरण अभ्यासने.
3. जिल्ह्यातील लोकसंख्या वितरणाची कारणमीमांसा स्पष्ट करणे.
4. सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी लोकसंख्येतील बदलांचा अभ्यास करणे

**माहितीचा स्रोत आणि संशोधन / अभ्यास पद्धती:**

सध्याचा अभ्यास हा प्रामुख्याने दुय्यम माहितीच्या स्रोतावर आधारित आहे. सन 2001 आणि 2011 या कालावधीमधील सोलापूर जिल्ह्याच्या, जिल्हा जनगणनेच्या अहवालामधुन लोकसंख्या विषयक माहिती

गोळा करून त्याचे पृथ्थकरण केले आहे. लोकसंख्या वाढीच्या मोजमापाकरिता खालील सूत्र विचारात घेतले आहे.

$$R = \frac{Pn - Po}{Po} \; X \; 100$$

याठिकाणी:

R = लोकसंख्येचा वाढीचा दर.

Pn = चालू वर्षाची लोकसंख्या

Po = लोकसंख्येचे आधारभूत वर्ष.

लोकसंख्येची वाढ हा माणसाच्या जीवनाशी निगडित महत्त्वाचा घटक आहे. लोकसंख्यावाढीस वेगवेगळी कारणे कारणीभूत आहेत त्यामध्ये प्रामुख्याने, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक कारणे लोसंख्यावाढीस कारणीभूत ठरतात, वरील सूत्राच्या अभ्यासद्वारे लोकसंख्येची दशवार्षिक वाढ लक्षात येते.

**सोलापूर जिल्हा लोकसंख्या वाढ (जनगणना वर्षे 2001 ते 2011):**

**सन 2001 ची जिल्हाची लोकसंख्या**:

खालील तक्त्यात सोलापूर जिल्ह्यामधील जनगणना वर्षे 2001 मधील लोकसंख्या दर्शविलेली आहे. त्यामध्ये सर्वात जास्त लोकसंख्या ही प्रामुख्याने उ. सोलापूर, पंढरपूर, बार्शी आणि माळशिरस इत्यादी तालुक्यांमध्ये जास्त असल्याचे आढळून येते, याचे मुख्य कारण म्हणजे हे तालुके आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक दृष्ट्या विकसित आहेत. तसेच मध्यम लोकसंख्या द. सोलापूर, माढा, मोहोळ आणि अक्कलकोट तालुक्यांमध्ये आढळून येते तर कमी लोकसंख्येमधे करमाळा, सांगोला आणि मंगळवेढा या तालुक्यांचा समावेश होतो.

**तक्ता क्रमांक: 1 सोलापूर जिल्हा लोकसंख्या (जनगणना वर्षे 2001आणि 2011)**

| अ. क्र. | तालुका | जनगणना वर्षे | | लोकसंखेची वाढ % |
|---|---|---|---|---|
| | | 2001 | 2011 | 2001-2011 |
| 1 | करमाळा | 233316 | 254489 | 9.07 |
| 2 | बार्शी | 340831 | 372711 | 9.35 |
| 3 | माढा | 292611 | 324027 | 10.74 |
| 4 | मोहोळ | 252526 | 276920 | 9.66 |
| 5 | उ. सोलापूर | 960803 | 1057352 | 10.05 |
| 6 | द. सोलापूर | 210774 | 260897 | 23.78 |
| 7 | अक्कलकोट | 290037 | 314570 | 8.46 |
| 8 | पंढरपूर | 402707 | 442368 | 9.85 |
| 9 | सांगोला | 272077 | 322845 | 18.66 |
| 10 | मंगळवेढा | 171261 | 205932 | 20.24 |
| 11 | माळशिरस | 422600 | 485645 | 14.92 |
| सोलापूर जिल्हा | | 3849543 | 4317756 | 12.16 |

*(स्त्रोत: सोलापूर जिल्हा जनगणना अहवाल 2001 आणि 2011)*




**सन 2011 ची जिल्ह्याची लोकसंख्या:**

वरील तक्त्यात सोलापूर जिल्ह्यामधील जनगणना वर्ष 2011 मधील लोकसंख्या दर्शविलेली आहे. त्यामधे सर्वात जास्त लोकसंख्या ही प्रामुख्याने उ. सोलापूर, पंढरपूर, बार्शी आणि माळशिरस इत्यादी

तालुक्यांमध्ये जास्त असल्याचे आढळून येते, त्याचे प्रामुख्याने कारण म्हणजे हे तालुके विकसित आहेत, तसेच मध्यम लोकसंख्या माढा, सांगोला आणि अक्कलकोट तालुक्यांमध्ये आढळून येते तर कमी लोकसंख्येमध्ये द. सोलापूर, मोहोळ करमाळा आणि मंगळवेढा या तालुक्यांचा समावेश होतो.

**सोलापूर जिल्ह्याची सन 2001 ते 2011 ची लोकसंख्येची (शेकडेवारीत) दशवार्षिक वाढ:**

वरील तक्त्यात सोलापूर जिल्ह्यामधील सन 2001 ते 2011 पर्यंतची लोकसंख्येची दशवार्षिक वाढ शेकडेवारीत दर्शविली आहे. सोलापूर जिल्ह्याची एकूण दशवार्षिक वाढ 12.16 % झालेली दिसून येते, वरील तक्त्याचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की लोकसंख्येची सर्वात जास्त दशवार्षिक वाढ ही 23.78% प्रामुख्याने दक्षिण सोलापूर या तालुक्यात आढळून येते कारण दक्षिण सोलापूर हे ठिकाण जिल्हा मुख्यालयाअंतर्गत येते तसेच त्या ठीकाणाचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, औदोगिक विकास झाल्यामुळे त्या ठिकाणी लोकसंख्या जास्त आढ्ळून येते. वरील तक्त्यात प्रामुख्याने उ. सोलापूर, सांगोला, मंगळवेढा, माळशिरस या तालुक्यात जास्त 4 ते 20% पर्यंत लोकसंख्या वाढ झालेली दिसुन येते. मध्यम लोकसंख्या वाढ ही प्रामुख्याने करमाळा, बार्शी, मोहोळ, पंढरपूर या तालुक्यात झालेली दिसुन येते, तर केवळ 8.46 % लोकसंख्या वाढ ही अक्कलकोट तालुक्यात झालेली दिसुन येते. या तालुक्यात लोकसंख्या वाढ ही वरील तालुक्यांच्या तुलनेत सर्वात कमी अढ्ळून येते.

**सोलापूर जिल्ह्याची सन 2001 ते 2011 ची नागरी लोकसंख्या (शेकडेवारीत) दशवार्षिक वाढ:**

खलील तक्ता क्रमांक: 2 मध्ये सोलापूर जिल्ह्यामधील सन 2001 ते 2011 पर्यंतची नागरी लोकसंख्येची (शेकडेवारीत) दशवार्षिक वाढ/घट दर्शविली आहे. सोलापूर जिल्ह्याची एकूण नागरी लोकसंख्येची दशवार्षिक वाढ 87.24 % झालेली दिसून येते, खलील तक्त्याचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की लोकसंख्येची धनात्मक/ ऋणात्मक दशवार्षिक वाढ/घट दिसून येते. नागरी लोकसंख्येची सर्वात जास्त धनात्मक वाढ ही 90 % पेक्षा जास्त प्रामुख्याने उ. सोलापूर आणि माळशिरस या तालुक्यात आढळून येते कारण त्या ठीकाणाचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, औदोगिक विकास झाल्यामुळे त्या ठिकाणी लोकसंख्या जास्त आढ्ळून येते. वरील तक्त्यात मध्यम लोकसंख्या वाढ प्रामुख्याने बार्शी, पंढरपूर आणि सांगोला तालुक्यात झालेली आढळून येते. तर कमी लोकसंख्या वाढ मंगळवेढा, करमाळा आणि अक्कलकोट या तालुक्यात झालेली दिसुन येते, तर मोहोळ

आणि दक्षिण सोलापूर या तालुक्यात कोणत्याही प्रकारची नागरी लोकसंख्या वाढ झालेली दिसुन येते नाही. माढा या तालुक्यात लोकसंख्याची ऋणात्मक (-1.40) दशवार्षिक घट झाल्याचे अढ्ळून येते.

**तक्ता क्रमांक: 2 सोलापूर जिल्हा नागरी आणि ग्रामीण लोकसंख्या**
**(जनगणना वर्षे 2001आणि 2011)**

| अ. क्र. | तालुका | जनगणना वर्षे 2001 | | जनगणना वर्षे 2011 | | लोकसंख्या वाढ(%) - 2001 ते 2011 | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नागरी लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या | नागरी लोकसंख्या | ग्रामीण लोकसंख्या | नागरी लोकसं ख्या | ग्रामीण लोकसंख्या |
| 1 | करमाळा | 21918 | 211388 | 23199 | 231290 | 5.52 | 8.60 |
| 2 | बार्शी | 104785 | 236044 | 118722 | 253898 | 11.74 | 7.03 |
| 3 | माढा | 22777 | 269834 | 22463 | 301564 | -1.40 | 10.52 |
| 4 | मोहोळ | 0 | 252526 | 0 | 276920 | 0.00 | 8.81 |
| 5 | उ. सोलापूर | 872478 | 88325 | 9151558 | 105794 | 90.47 | 16.51 |
| 6 | द. सोलापूर | 0 | 210744 | 0 | 260897 | 0.00 | 19.22 |
| 7 | अक्कलकोट | 62115 | 227922 | 63680 | 250890 | 2.46 | 9.15 |
| 8 | पंढरपूर | 91339 | 311328 | 98923 | 343445 | 7.67 | 9.35 |
| 9 | सांगोला | 28116 | 243961 | 34321 | 288524 | 18.08 | 15.45 |
| 10 | मंगळवेढा | 21706 | 149555 | 21824 | 184108 | 0.54 | 18.77 |
| 11 | माळशिरस | 0 | 422600 | 64401 | 421244 | 100 | -0.32 |
| सोलापूर जिल्हा. | | 1225234 | 2624227 | 9599091 | 2918574 | 87.24 | 10.09 |

*(स्त्रोत: सोलापूर जिल्हा जनगणना अहवाल 2001 आणि 2011)*

**सोलापूर जिल्ह्याची सन 2001 ते 2011 ची ग्रामीण लोकसंख्या (शेकडेवारीत) दशवार्षिक वाढ:**

वरील तक्ता क्रमांक: 2 मध्ये सोलापूर जिल्ह्यामधील सन 2001 ते 2011 पर्यंतची ग्रामीण लोकसंख्येची (शेकडेवारीत) दशवार्षिक वाढ/घट दर्शविली आहे. सोलापूर जिल्ह्याची एकूण ग्रामीण लोकसंख्येची दशवार्षिक वाढ 10.09 % झालेली दिसून येते, वरील तक्त्याचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की लोकसंख्येची धनात्मक/ ऋणात्मक दशवार्षिक वाढ/घट दिसून येते. ग्रामीण लोकसंख्येची सर्वात जास्त धनात्मक वाढ ही 15 % पेक्षा जास्त प्रामुख्याने उ. सोलापूर, दक्षिण सोलापूर सांगोला आणि मंगळवेढा या तालुक्यात आढळून येते कारण त्या ठिकाणी लोकसंख्या वाढीचा दर जास्त आढ्ळून येतो. वरील तक्त्यात मध्यम लोकसंख्या वाढ

प्रामुख्याने करमाळा, पंढरपूर माढा, आणि अक्कलकोट तालुक्यात झालेली आढळून येते. तर कमी लोकसंख्या वाढ बार्शी आणि मोहोळ या तालुक्यात झालेली दिसुन येते, तर माळशिरस या तालुक्यात ग्रामीण लोकसंख्याची ऋणात्मक (-0.32) दशवार्षिक घट झाल्याचे अढ्ळून येते.

**निष्कर्ष:**

एकूणच संशोधन कालावधीमधील, अभ्यासातून असे दिसून आले आहे की अभ्यास क्षेत्रातील लोकसंख्या वाढीवर, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक घटकांचा मोठा प्रभाव आहे. सोलापूर जिल्ह्यात सर्वात जास्त लोकसंख्येची दशवार्षिक वाढ प्रामुख्याने दक्षिण सोलापूर या तालुक्यात आढळून येते कारण दक्षिण सोलापूर ठिकाण जिल्हा मुख्यालयाअंतर्गत येते तसेच त्या ठीकाणाचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक विकास झाल्यामुळे त्या ठिकाणी लोकसंख्या जास्त आढ्ळून येते, तर सर्वात कमी लोकसंख्या वाढ ही अक्कलकोट तालुक्यात झालेली दिसुन येते. नागरी लोकसंख्येची सर्वात जास्त धनात्मक वाढ ही उ. सोलापूर आणि माळशिरस या तालुक्यात आढळून येते. माढा या तालुक्यात नागरी लोकसंख्याची ऋणात्मक दशवार्षिक घट झाल्याचे अढ्ळून येते. ग्रामीण लोकसंख्येची सर्वात जास्त धनात्मक वाढ उ. सोलापूर, दक्षिण सोलापूर, सांगोला आणि मंगळवेढा या तालुक्यात आढळून येते कारण त्या ठिकाणी लोकसंख्या वाढीचा दर जास्त आढ्ळून येतो. माळशिरस या तालुक्यात ग्रामीण लोकसंख्याची ऋणात्मक दशवार्षिक घट झाल्याचे अढ्ळून येते.

**संदर्भ ग्रंथ:**


1. *ए. बी. सौदी आणि पी. एस. 'कोळेकर मानवी लोकसंख्या भूगोल' निराली प्रकाशन, पुणे 1995*
2. *जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन सन 2017, सोलापूर जिल्हा सांख्यिकी कार्यालय सोलापूर.*
3. *डॉ. दामाजी, 'लोकसंख्याशास्त्रीय अभ्यास' फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2020*
4. *डॉ. शिवराम ठाकूर, 'लोकसंख्या आर्थिक भूगोल', प्रकाशक प्रभारी संचालक दूर व मुक्त अध्ययन संस्था मुंबई विद्यापीठ मुंबई 2018*
5. *सोलापूर जिल्हा जनगणना अहवाल 2001*
6. *सोलापूर जिल्हा जनगणना अहवाल 2011*